# भूजल पुनर्भरण या घटकांतर्गत
# विहीरींचे पुनर्भरण
# A३.५.१

**प्रस्तावना:**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणीसाठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भू-भाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

जमिनीवरील पाण्याचा साठा व भूजलसाठा हे पाण्याचे दोन्ही साठे प्रामुख्याने पावसावरच अवलंबून आहेत. पाऊसमान चांगले असल्यास जमिनीवरील पाणीसाठे उदा. धरणे, शेततळी, तलाव इत्यादी तसेच पाणी जिरल्यामुळे भूजलसाठ्यात वाढ होते. लोकसंख्या वाढ, शहरीकरण, औद्योगीकरण, जमीन व पाण्याचे अयोग्य व्यवस्थापन, पाणी वापरासंबंधी साक्षरतेचा अभाव, जास्त पाणी लागणाऱ्या पिकांखालील क्षेत्रात होत असलेली वाढ, भूजल पुनर्भरणासाठीचे अपुरे प्रयत्न, नैसर्गिकरीत्याही भूजल पुनर्भरण कमी होणे, दुष्काळी परिस्थितीमुळे भूजलाची वाढलेली मागणी या व अशा कारणांमुळे भूजलपातळी खोल गेलेली आहे. ज्या प्रमाणात भूजलाचा उपसा करण्यात येत आहे, त्याप्रमाणात भूजलाचे पुनर्भरण होत नाही, त्यामुळे भूजल पातळी दिवसेंदिवस खोल गेलेली आहे. भूजल पातळी वाढवण्यासाठी पावसाचे पाणी जिथे जिथे शक्य आहे, त्या ठिकाणी जिरविण्याचे प्रयत्न करणे आवश्यक तर आहेच, सोबतच उपलब्ध असलेल्या भूजलाचा काटकसरीने व शास्त्रीय पद्धतीने वापर करणे गरजेचे आहे.

सद्यस्थितीत राज्यातील टंचाईग्रस्त परिस्थिती पाहता व शेतक-यांकडे पिकास संरक्षित सिंचन देणेकरिता अस्तित्वातील विहिरीद्वारे पाण्याची उपलब्धता होणेचे अनुषंगाने जागतिक बँक अर्थसहाय्यीत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत भूजल पुनर्भरणाकरिता विहीर पुनर्भरण हे वैयक्तिक लाभाचे घटक राबविण्यात येत आहे.

**उद्दिष्टे:**

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आलेल्या गावसमुहातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.

२. कृषि क्षेत्रात सिंचनासाठी अस्तित्वात असलेल्या विहिरीचे पुनर्भरण करून भूजलाच्या स्थितीत वाढ करणे.
३. दुष्काळग्रस्त भागामध्ये जास्तीचा पाणी साठा जतन करणे व लोकांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणे.

**लाभार्थी निवडीचे निकष :**

१. प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावासाठीच्या ग्राम कृषी संजीवनी समितीने (VCRMC) मान्यता दिलेल्या अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना, अनु. जाती/ जमाती, महिला, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करून लाभ देण्यात यावा.
२. ज्या विहिरी बंद पडलेल्या आहेत तसेच ज्यांची पाण्याची पातळी खोल गेलेली आहे, अशा शेतकऱ्यांना प्राधान्याने लाभ देण्यात येईल.
३. पुनर्भरण करावयाच्या विहिरीची नोंद संबंधित लाभार्थीच्या ७/१२ वर असणे आवश्यक आहे.
४. या घटकाचा इतर कोणत्याही योजनेतून पूर्वी लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा लाभ देय नाही.

**अर्थसहाय्य:**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विहीर व कुपनलिका पुनर्भरण घटकासाठी अनुज्ञेय अनुदानाचा तपशील खालीलप्रमाणे;

| तांत्रिक मापदंड | विहीरींचे पुनर्भरण (प्रकार) | अनुज्ञेय अनुदान (रु.) येणा-या खर्चाच्या १००% किंवा जास्तीत जास्त रु. | |
|---|---|---|---|
| | | ज.जा.उ.यो. /डो.भाग | इतर |
| **१) साठवण खड्डा-** ३ मी. X ३ मी. X २ मी.<br>**२) शोष खड्डा** - २ मी. X२ मी. X २ मी.<br>**३) साठवण खड्डयाकरिता इनलेट §** लांबी २० मी., माथा १.२० मी., पाया ०.६० मी., खोली ०.६० मी.<br>**४) साठवण खड्डा ते शोष खड्डा नाली -** लांबी २ मी., माथा ०.९० मी., पाया ०.६० मी., खोली ०.३० मी.<br>**५) शोष खड्डयाकरिता आउटलेट-** लांबी १५ मी., माथा०.९० मी., पाया ०.६० मी., खोली ०.३० मी. | अ.भारी जमीन पक्की विहीर | १२०६३ | ११३९७ |
| | ब.हलकी जमीन पक्की विहीर | १२५२४ | ११७९७ |
| | क.भारी जमीन कच्ची विहीर | १३५९४ | १२८४६ |
| | अ.हलकी जमीन कच्ची विहीर | १४०५५ | १३२४६ |

**संदर्भ:** जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र.मापदंड -२०१३ /प्र.क्र.११४/जल-७ दिनांक १० ऑक्टोबर२०१३ नुसार निर्धारीत तांत्रिक व आर्थिक मापदंड.सदरचे दर मजुराच्या सहाय्याने काम करणेसाठीचे आहेत .मशिनच्या सहाय्याने काम करावयाचे असल्यास मृद व जलसंधारण विभागाची सामाईक दर सूची २०१७-१८(दि.२०/१२/२०१७ पासून लागू)प्रमाणे निर्धारित केलेले दर तसेच वेळोवेळी सुधारित झालेले दर वापरून अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.

मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केल्यानूसार निश्चित केलेल्या तांत्रिक निकषांनुसार साहित्य असणे आवश्यक आहे.

**अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या-**

**लाभार्थी**

१. इच्छुक शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेत स्थळावर (उपलब्ध झाल्यानंतर) समूह सहाय्यकाच्या मदतीने नोंदणी करावी व ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC) कडे विहित नमुन्यात (प्रपत्र-१) आवश्यक कागदपत्रासहित अर्ज सादर करावा.
२. पूर्वसंमती पत्रासोबत दिलेल्या तांत्रिक निकषाप्रमाणे साहित्य खरेदी करणे बंधनकारक राहील.
३. आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील. तसेच कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम ) मिळणार नाही.
४. निवडलेल्या लाभार्थींना त्यांच्या पसंतीनुसार अनुभवी व्यक्ती / संस्थेकडून सदरचे काम करण्याची मुभा राहणार आहे.
५. काम पूर्ण झाल्यानंतर संबंधीत कृषि सहाय्यक/समूह सहाय्यक यांना कळविणे.
६. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी पूर्व संमती दिल्यानंतर घटकाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी. देय अनुदान मिळणेसाठी मागणीपत्र (प्रपत्र-४) संबधित कृषी सहाय्यका मार्फत उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या नावे सादर करावे. सोबत पुनर्भरणासाठी आलेल्या खर्चाची बिले शेतकऱ्यांने स्वत:ची स्वाक्षरी करून सादर करणे आवश्यक आहे.

**ग्राम कृषी संजीवनी समिती (VCRMC)**

१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांचे घटकांतर्गत बाबीचा लाभ घेण्यासाठीचे विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करून घ्यावेत.
२. प्राप्त सर्व अर्ज व सादर केलेली कागदपत्रे कृषी सहाय्यक यांचे मदतीने छानणी करून अर्जाची अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना, अनु. जाती/ जमाती, महिला शेतकरी, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करावी.
३. इच्छुक लाभार्थ्यांचे प्राप्त अर्जाच्या पात्र/अपात्र ते बाबत निर्णय घेऊन अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
४. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकांतर्गत बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करावे.

**समूह सहाय्यक**

१. इच्छुक लाभार्थी शेतक-यांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेत स्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करावी.

२. शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व शेतकऱ्यांने सादर केलेली कागदपत्रे कृषि सहाय्यक यांचे मदतीने छाननी करुन अर्जांची अत्यल्प व अल्प भूधारक अशी प्रवर्गनिहाय अनु.जाती / अनु. जमाती / दिव्यांग /महिला शेतकरी / इतर सर्वसाधारण शेतकरी या प्राधान्यक्रमाने वर्गवारी करावी.
३. उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून प्राप्त पूर्वसंमती पत्रांच्या नोंदी ठेवणे. शेतकऱ्यांस योजनेच्या अटी व शर्ती तसेच घटकाबाबतचे आर्थिक व तांत्रिक निकष समजावून सांगावे.
४. प्रकल्प स्थळाचे भौगोलिक स्थानांकन (Geo tagging) करण्यास कृषी सहाय्यक यांना मदत करावी. लाभार्थी व तपासणी अधिकारी यांचे समवेत अंमलबजावणी पूर्वी व अंमलबजावणी नंतर प्रकल्प स्थळाचे अक्षांश/रेखांश सह फोटो काढावेत. सदरचे फोटो प्रकल्पाच्या संगणक प्रणालीवर अपलोड करावेत. (स्थळ पाहणी व मोका तपासणीच्या वेळेस)

**कृषि सहाय्यक**

१. कागदपत्रांची छाननी करताना शेतकऱ्यांचे विहीत नमुन्यातील अर्ज, शेतकऱ्यांच्या मालकी हक्काचा ७/१२ उतारा, ८-अ, यापूर्वी इतर योजनेतून लाभ घेतलेला आहे काय या बाबतचा तपशिल, प्राधिकृत अधिकाऱ्याचे संवर्ग प्रमाणपत्र (अ.जाती, अ.जमाती शेतकऱ्यांसाठी) आहे काय, इत्यादी सर्व अनुषंगीक बाबींची पडताळणी करावी.
२. पात्र अर्जांच्या नियोजित प्रकल्प स्थळाची तसेच ८-अ मध्ये नमूद सर्व गट/सर्वे नं. मध्ये पाहणी करुन विहिरीमधील पाण्याची उपलब्धता व तांत्रिक दृष्ट्या आवश्यक इतर बाबी आहेत / नाहीत याबाबत तपासणी करावी असल्यास याबाबतचा तपशील नमूद करावा आणि नियोजित प्रकल्प स्थळ व लाभार्थी सदर घटकासाठी पात्र आहे किंवा नाही याबाबत लेखी अहवाल सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात (प्रपत्र-३) उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा.
३. विहीर पुनर्भरण बाबतचे अंदाजपत्रक तयार करून उपविभागीय कृषि अधिकारी यांना तांत्रिक मान्यतेसाठी सादर करणे.
४. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यास इतर योजनेतून शासकीय अनूदान घेतले असल्या/नसल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी त्याची खात्री करून ही बाब प्रकल्प मंजूरीसाठी सादर करताना उपविभागीय कृषि अधिकारी यांना अवगत करावी.
५. लाभार्थी शेतकऱ्यांने काम पूर्ण झाल्याचे कळविल्यानंतर संबंधित कृषि सहाय्यक यांनी झालेले काम मार्गदर्शक सूचनेत दिल्याप्रमाणे तांत्रिक दर्जाचे असल्याबाबत मोका तपासणी करावी व झालेल्या कामाच्या मापन पुस्तिकेत नोंदी घेणे. सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात (प्रपत्र-५) तपासणी अहवाल तयार करावा. तपासणी अहवालावर लाभार्थीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली लाभार्थीचे नाव नमूद करावे. तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थीस द्यावी. तपासणी अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावा.

**कृषी पर्यवेक्षक**

१. लाभार्थी /ग्राम कृषी संजीवनी समिती (VCRMC) / कृषी सहाय्यक/ समूह सहाय्यक यांनी अवगत केल्यानंतर कृषी पर्यवेक्षक यांनी, राबविलेल्या घटकाची अनुदान अदायगी पूर्वी १०% तपासणी करावी. तपासणी केलेल्या कामाच्या नोंदी मापन पुस्तिकेत प्रमाणित कराव्यात. सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (प्रपत्र- ६) तपासणी अहवाल तयार करावा. तपासणी अहवालावर लाभार्थीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली लाभार्थीचे नाव नमूद करावे. तपासणी अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावा.

**उपविभागीय कृषि अधिकारी**

१. सर्व शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची छाननी, ग्राम कृषी संजीवनी समितीची मान्यता व स्थळ तपासणी अहवाल विचारात घेवून अर्जाच्या पात्र / अपात्रतेबाबत निर्णय घ्यावा व अपात्र असल्यास लाभार्थीस कारणासहित अवगत करावे.
२. अर्ज सादर केलेल्या पात्र शेतकऱ्यांस विहित नमुन्यात पूर्वसंमती द्यावी (प्रपत्र-३).
३. कृषि सहाय्यक यांचेकडून प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देणे.
४. लाभार्थी शेतकऱ्याने अवगत केल्यानंतर कृषि सहाय्यक/ कृषि पर्यवेक्षक यांचेकडून तपासणी पूर्ण करून घ्यावी.
५. शेतकऱ्यास पूर्वसंमती देतांना पूर्वसंमती पत्रासोबत तांत्रिक बाबी व देय अनुदान याबाबत अवगत करावे.
६. अनुदान प्रस्ताव, प्रथम (मोका) व अंतिम तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पासाठीचे कृषि पर्यवेक्षक यांनी अनुदान प्रस्ताव तपासून अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.
७. पात्र लाभार्थींना निधी उपलब्धतेनुसार DBT द्वारे ७ दिवसात अनुदान अदायगी करावी.
८. उपविभागांतर्गत राबविलेल्या घटकांपैकी २% लाभार्थ्यांची अनुदान अदायगीपूर्वी तपासणी करावी.

**जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी:-**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची आकस्मिक तपासणी करावी व विहित प्रपत्रात अहवाल सादर करावा.
३. उपविभागीय कृषि अधिकारी यांना आवश्यकतेनुसार निधी वितरण व सनियंत्रण करावे.

**तांत्रिक मार्गदर्शक सुचना**

**अ) विहिरीचे पुनर्भरण –**

१. या घटकाची अंमलबजावणी करीत असतांना, प्राधान्याने अतिविकसित )Over Exploited) विकसित, (Critical), अंशत) विकसित :Semi Critical) व सुरक्षित )Safe) वर्गवारीत समाविष्ट असलेल्या क्षेत्रामध्ये हा घटक राबविण्यात यावा.

२. प्रत्येक पाणलोटांतर्गत साठवण क्षेत्र, पुनर्भरण क्षेत्र व सर्वात शेवटी अपधाव क्षेत्रातंर्गतच्या गावांतील विहीरींमध्ये एकत्रितपणे )Cluster Approach) हा घटक राबविण्यात यावा.

३. विहीरींची निवड करीत असतांना त्याची खोली पुरेशी असावी, जेणे करून त्या भागात अस्तित्वात असलेला जलधारक खडक पूर्णपणे भेदलेला असा त्यामुळे विहीर पुनर्भरण करून कृत्रिमरित्या भूजल उपलब्धतेत वाढ करता येणे शक्य होईल.

४. ज्या विहीरींमधील ऑक्टोबर महिन्यातील पाण्याची पातळी सरासरी ४ मीटर पेक्षा खाली असेल अशाच ठिकाणी ही योजना राबविण्यात यावी, जेणे करून पावसाळ्यात विहीरींमध्ये पाणी मुरविता येणे शक्य होईल.

५. गावातील जास्तीतजास्त विहीरी शक्यतो एकत्रितपणे या योजनेसाठी निवडण्यात याव्यात, जेणे करून त्याचा फायदा गावाला लगेच मिळणे शक्य होईल.

६. वरील सर्व निकषांनुसार अस्तित्वात असणाऱ्या विहीरी या योजनेसाठी निवडण्यात याव्यात .

७. विहीरींची निवड करीत असतांना पाणथळ क्षेत्र, अतिपाणी वापरामुळे जमीन खारवट झालेले क्षेत्र, प्रदूषणाची समस्या असलेले क्षेत्र आदी टाळण्यात यावेत.

८. केंद्र शासनाने निर्धारित करून दिलेल्या गाळणथरांचाच (Filter) उपयोग करून कृत्रिम पुनर्भरण करण्यात यावे गाळणथंराशिवाय .हा घटक राबविण्यात येऊ नये.

९. फिल्टरच्या माध्यमातून फिल्टर होऊन विहीरींत जाणारे पाणी गाळविरहित असावे . त्याचबरोबर त्यात प्रदूषित घटकांचा अंतर्भाव असू नये.जसे उकीर्ड्यावरील अथवा इतर सांडपाणी फिल्टर मध्ये येणार नाही याची काळजी घ्यावी.यासाठी आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात याव्यात .

१०.फिल्टर हे विहीरींच्या वरच्या (Upstream) बाजूसच करण्यात यावा.

११. फिल्टरचे बांधकाम करीत असतांना ते मजबूत व टिकाऊ असेल याची दक्षता घ्यावी तसेच त्याच्या खोदकामाचे वेळी अथवा विहीरीला जोडत असतांना विहीरींला धोका होणार नाही याची काळजी घ्यावी .त्यसाठी विहीर व फिल्टर मध्ये समयोचित अंतर ठेवावे.

१२.शेतातील जास्तीतजास्त पाणी विहीर पुनर्भरणासाठी उपलब्ध व्हावे याकरिता आवश्यकतेनुसार चरांसारखी व्यवस्था उपभोक्त्यांच्या मदतीने करून घ्यावी.

१३.पावसाचे पाणी, जमिनीवरील अथवा ओढ्याचे पाणी खूप जास्त प्रमाणावर येण्याची शक्यता असल्यास जादाचे पाणी फिल्टर पासून दूर काढून देण्याची व्यवस्था करण्यात यावी. जेणेकरून फिल्टर ल होणारा पुराचा धोका टाळता येईल.

**प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

१. खूप वेगाने पाऊस पडत असल्यास जास्तीचे पाणी गाळणखड्ड्याच्या पासून दूरवर नाल्यात / शेताबाहेर सोडण्याची व्यवस्था करण्यात यावी.
२. गाळणखड्ड्याच्या क्षमतेइतके पाणी गाळणखड्ड्यात सोडण्याची व्यवस्था करण्यात यावी, त्यासाठी शेतात येणाऱ्या पाण्यापैकी काही हिस्साच गाळणखड्ड्याकडे आणण्याची व्यवस्था असावी.
३. काडी - कचरा अथवा इतर गाळ गाळणखड्ड्यात येऊ नये यासाठी योग्य ती व्यवस्था करण्यात यावी.
४. ज्या भागात मातीचे प्रमाण जास्त असेल त्याठिकाणी गाळणखड्ड्यांमध्ये माती पडू नये यासाठी आवश्यक तो आधार देण्यात यावा.
५. गाळणखड्ड्यांत मोठ्या प्रमाणावर गाळ जमा झाला असल्यास पाऊस नसतांनाच्या काळात वरचा रेतीचा थर काढून तो पाण्याने धूवून घ्यावा. अथवा गाळण खड्ड्यात जमा झालेला गाळ काढून टाकण्यात यावा. अशाप्रकारे गाळ गाळणखड्ड्यात साचणार नाही याची काळजी घेतल्यास गाळणखड्ड्यातून पाणी पूर्ण क्षमतेने गाळल्या जाऊन स्वच्छ पाणी विहीरीत पडण्यास मदत होईल.
६. लाभार्थींना गाळणखड्ड्यांबाबत प्रशिक्षित करणे फार आवश्यक आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे पडणाऱ्या पावसाचा वेग व गाळणखड्ड्यांत येणारे पाणी यावर शेतकऱ्यांनी सतत लक्ष ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा गाळणखड्डा भरून गढूळ पाणी विहीरीत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.
७. गाळणखड्डा व विहीरी यात सुरक्षित अंतर ठेवणे आवश्यक आहे.
८. गाळणखड्डा विहीरीला जोडण्यासाठी करण्यात यावयाचा ट्रेंच पीव्हीसी पाईप घातल्यावर दगड टाकून व्यवस्थितपणे बुजविण्यात यावा. त्याचप्रमाणे ज्याठिकाणी पाईप विहीरीत सोडण्यात आलेला आहे ती जागा देखील व्यवस्थित बंद करण्यात यावी.
९. पूर परिस्थिती उद्भवण्याचा धोका दिसत असल्यास गाळणखड्ड्याकडे येणारे सर्व पाणी पूर्णपणे बंद करण्यात यावे व ते शेताबाहेर अथवा नाल्यामध्ये जाईल अशाप्रकारे व्यवस्था करण्यात यावी.

## संकल्प चित्र – विहिरचे पुनर्भरण




विहिर पुनर्भरण

<u>प्रपत्र-१</u>

<u>प्रकल्पांतर्गत लाभासाठी निवड होणेकरिता अर्ज व हमीपत्र</u>

**जागतिक बँक अर्थसहाय्यित**

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

(प्रत्येक घटकासाठी स्वतंत्र अर्ज करावा)

**प्रति,**

**मा. अध्यक्ष, ग्राम कृषि संजीवनी समिती .......................... (अर्जदाराचे गाव) .................................**

**गावसमूह क्रमांक...................................तालुका ................................ जिल्हा ................................**

**महोदय,**

जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी, माझ्या मालकीहक्काचे शेत जमिनीमध्ये हवामान बदलास पुरक पध्दतीने शेती करण्यासाठी गुंतवणूक करणेस तयार आहे, त्याकरिता या प्रकल्पांतर्गत खालील घटकाचा लाभ मिळावा,ही विनंती.

**मागणी केलेल्या घटकाचे नाव-...........................................................**

**घटकाचा तपशील[१].-.....................................................................**

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | अर्जदार शेतकऱ्यांचे संपूर्ण नाव | (आडनाव) (प्रथम नाव) (वडीलाचे नाव)<br>....................... .............................. .......................... |
| २. | पूर्ण पत्ता | घर क्र. ............... गल्ली क्र./भागाचे नाव .....................<br>गाव............................... पोस्ट..................................<br>तालुका............................ जिल्हा..............................<br>पिन क्र.- ☐☐☐☐☐☐ |
| ३. | भ्रमणध्वनी क्रमांक-[२] | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ४. | स्त्री/पुरुष(लागू असेल तेथे √ अशी खूण करावी) | स्त्री ☐ पुरुष ☐ |
| ५. | जात प्रवर्ग (लागू असेल तेथे √अशी खूण करावी) | अ.जा. ☐ अ.ज. ☐ इतर ☐ |
| ६. | अर्जदार दिव्यांग आहे काय?( लागू तेथे √ खूण करावी) | होय ☐ नाही ☐ |
| ७. | दारिद्रय रेषेखालील असल्यास - यादीतील अ.क्र[३]. | ☐☐☐☐☐☐☐☐ |

[१] या मध्ये अनुदान मागणी केलेल्या घटकाचा तपशील उदा. शेततळ्याचा आकार, हरितगृहाचा/शेडनेटचा आकार, फळबाग लागवड असल्यास फळपिक नाव, क्षेत्र इ. तसेच ठिबक, तुषार असल्यास- पिकाचे नाव-क्षेत्र इ. तपशील नमूद करावा.

[२] प्रकल्पाच्या विविध घटकातील माहितीची देवाण-घेवाणीसाठी भ्रमणध्वनी क्रमांकाचा प्रकल्पाच्या कामकाजासाठी वापर करण्यास माझी सहमती आहे.

[३]दारिद्र्य रेषेखालील दाखला सोबत जोडण्याची आवश्यकता नाही. तथापि ग्राम कृषी संजीवनी समिती लाभार्थी निवड करतेवेळी अर्जदार दारिद्र्य रेषेखालील असल्याबाबत खात्री करून अर्जाबाबत उचित निर्णय घेऊ शकेल.

| | | |
|---|---|---|
| ८. | आधारकार्ड क्र.[४] | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ९. | स्वत:च्या नावावरील एकूण क्षेत्र (८-अ प्रमाणे) | खाते क्र............................ <br> एकूण जमिनधारणा ☐ हेक्टर) ☐) |
| १०. | आरटीजीएस सुविधा असणाऱ्या बँकेचे नाव | |
| | खाते क्रमांक- | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| | बँकेची शाखा- | |
| | आयएफएससी कोड- | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ११. | घेत असलेली पिके- | |
| १२. | ज्या क्षेत्रावर घटक राबविणार आहे त्या क्षेत्राचा सर्व्हे/गट क्रमांक- | क्षेत्र \| गाव \| तालुका |
| १३. | मागणी केलेल्या बाबींचा तपशिल | १.पंप संच (विद्युत-५ एच पी/डिझेल इंजिन)------------------ <br> २.पाईप साहित्य (व्यास व प्रकार)-------------------- |
| १४. | यापूर्वी याच घटकाचा लाभ आपण अथवा आपल्या कुटुंबातील[५] अन्य सदस्यांनी या किंवा इतर योजनेतून घेतला आहे काय? असल्यास लाभ घेतलेली योजना,अनुदान रक्कम व लाभ घेतलेचे वर्षे इ.तपशील . | |
| १५. | मागणी केलेल्या घटकाचा एकूण अंदाजित खर्च. | रक्कम रुपये.............................. |
| १६. | निकषानुसार अपेक्षित अनुदान | रक्कम रुपये.............................. |
| १७. | अनुदान वजा जाता उवर्रित रक्कम कशा प्रकारे उभारणी करणार ? (लागू असेल तेथे √अशी खूण करावी) | स्वत: ☐ बँक कर्जाव्दारे ☐ |

सदर घटकासाठी माझी निवड झाल्यास आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन विहीत मुदतीत प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच प्रकल्प आधिकाऱ्यांच्या तांत्रिक देखरेखीखाली काम पूर्ण करीन व त्यानंतरच मला अनुदान देय राहील तसेच .सदरचे काम मी विहित मुदतीत व मार्गदर्शक सुचनेप्रमाणे पूर्ण न केलेस अनुदान मिळणार नाही, याची मला जाणीव आहे.

सदर बाबीचा लाभ घेत असताना वा त्यानंतर माझेकडुन गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास अथवा लाभांकित बाबीचा माझ्याकडुन गैरवापर झाल्याचे सिद्ध झाल्यास संबधित घटकासाठी मिळालेले अनुदान माझ्याकडून सव्याज वसुल केले जाईल याची मला स्पष्ट जाणीव आहे.

प्रकल्पाचे अधिकारी आणि इतर प्राधिकृत व्यक्तींना घटक तपासणीसाठी माझी संमती आहे तसेच, त्यांना या तपासणी कामासाठी सहकार्य करेन.

वरील सर्व माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

स्थळ:- (गावाचे नाव)..............................

दिनांक- / / २०-- **अर्जदार शेतक-याची सही/अंगठा**

---

कोठेही जतन अथवा सामाईकीकरण )share) केली जाणार नसून ती फक्त सी आय डी आर (Central Identities Data Repository) कडे पडताळणी करता सादर केली जाईल.

कुटुंब या व्याख्येत पती, पत्नी व १८ वर्षाखालील मुलांचा समावेश राहील.

**प्रपत्र - २**

(प्रकल्प स्थळ पाहणी व पात्रतेबाबत अभिप्राय-कृषि सहाय्यक)

श्री/ श्रीमती-------------------------------------------मु. पो.------------------ता.----------- जि.------------------ यांनी त्यांचे मालकीचे स.नं./गट नं. -----------मधील विहिरीसाठी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत विहीर पुनर्भरण या घटकासाठी अर्ज केलेला आहे. सदर अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) दिनांक -------रोजीच्या बैठकीमध्ये मंजूर केलेला आहे. सदर लाभार्थी विहीर पुनर्भरण या घटकाच्या निकषाप्रमाणे पात्र आहे. दिनांक --------------- रोजी भेट देऊन प्रस्तावित प्रकल्प स्थळाची लाभार्थी समक्ष पाहणी केली असता घटकासाठी आवश्यक व योग्य क्षेत्र लाभार्थ्याकडे उपलब्ध असून प्रकल्प राबविण्यासाठी लाभार्थी सक्षम व पात्र आहे.

सदर लाभार्थ्यास पूर्वसंमती देणेस शिफारस करणेत येत आहे.

**ठिकाण** **(स्वाक्षरी)**

**दिनांक** **कृषि सहाय्यक**

**नाव**

**ता.**

**जि.**

(टीप-कृषी सहाय्यक यांनी मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून उपरोक्त स्थळ तपासणी अहवाल भौगोलिक चिन्हांकनासह (Geo-tagging) द्यावा.)

**प्रपत्र -३**

**पूर्वसंमती पत्र**

(पुर्वसंमती पत्राचा नमूना)

जा.क्र. ------------------

कार्यालय- उपविभागीय कृषि अधिकारी, _____ उपविभाग ________, जिल्हा________

दिनांक - / /२०----

प्रति,

श्री/श्रीमती---------------------------------------------------मु.पो.--------------------तालूका - --------------------- जिल्हा --------------

आपल्या दिनांक -------------- रोजीच्या अर्जाप्रमाणे स.न.--------------मधील विहिरीचे पुनर्भरण या उपघटकासाठी आपली लाभार्थी म्हणून निवड करण्यात आली आहे. अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधिन राहून आपणांस विहिरीचे पुनर्भरण या बाबींच्या कामास प्रकल्पांतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार अनुज्ञेय रकमेसाठी पूर्वसंमती देण्यात येत आहे. आपल्या पसंतीनुसार सदरचे काम अनुभवी व्यक्ती /संस्था / स्वत: करण्यास आपणास मुभा आहे. सदरचे पूर्वसंमती पत्र मिळाल्यापासून ४५ दिवसांच्या आत आपण घटकाची अंमलबजावणी पूर्ण करणे बंधनकारक राहील अन्यथा सदर पूर्व संमती आपोआप रद्द होईल, याची नोंद घ्यावी.

सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर आपणास शासन निर्णयानुसार (मार्गदर्शक सुचना व मंजूर मापदंड इत्यादी) अनुज्ञेय अनुदान निधी उपलब्धते नूसार मंजूर करण्यात येईल. तसेच सदरचे अनुदान आपल्या राष्ट्रीयकृत बँकखात्यावर जमा करण्यात येईल. आपल्या प्रकल्प प्रस्तावास मंजूरी देणे, देय अनुदानाची रक्कम/देय कालावधी इत्यादी बाबी ठरविण्याचा अंतिम अधिकार नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प/शासनाचा राहील.

**उपविभागीय कृषि अधिकारी,**

**उपविभाग________**

**जिल्हा: __________**

.................

**प्रत** ,

माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित ,

१) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी------------

२) अध्यक्ष, ग्राम कृषी संजीवनी समिती------------

**प्रपत्र -४**

**(लाभार्थी अनुदान मागणी पत्र)**

**प्रती,**

उपविभागीय कृषि अधिकारी,

उपविभाग _________

जिल्हा: _________

**विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत देय अनुदान मिळणेबाबत.**

मी श्री. / श्रीमती..................................................................मु. .............पो. ............... ता.............. जि.............. आपणास विनंती करतो की, मला मिळालेल्या -----------रोजीच्या पूर्व संमतीनुसार नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत भूजल पुनर्भरण या घटकांतर्गत विहिरीचे / कुपनलिकाचे पुनर्भरण या उपघटकाचे काम आपण निर्गमित केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण केले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे;

खरेदी केलेल्या साहित्याचा तपशिल

| अ.क्र. | बाब | तपशिल | |
|---|---|---|---|
| १. | वापरलेले साहित्य | दगड, गोटे, जाड वाळू, बारीक वाळू | ...... ब्रास |
| २. | पुरवठादाराचे नाव व रक्कम | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |
| ६. | | | |
| ७. | वापरलेले साहित्य | तपशील परिमाण किंमत एकूण | |

सदर बाब संबधित कृषी सहाय्यक यांना अवगत केली आहे. तरी मला नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत विहिरीचे पुनर्भरण या घटकाच्या आर्थिक निकषानुसार देय अनुदान मिळावे. ही विनंती

**दिनांक :** **लाभार्थीची स्वाक्षरी/अंगठा**

**(नाव व पत्यासह)**

**प्रपत्र -५**

**मोका तपासणी अहवाल**

(कृषि सहाय्यक यांनी करणे)

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | लाभार्थ्याचे नाव | |
| २. | गावाचे नाव | |
| ३. | तालुका | |
| ४. | जिल्हा | |
| ५. | तपासणी दिनांक | |
| ६. | बाब | विहिरीचे पुनर्भरण |
| ७. | पूर्वसंमती क्र.व दिनांक | |
| ८. | मंजूर असलेल्या प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. ____ | क्षेत्र ----------हे. -----आर |
| ९. | प्रत्यक्षात  काम केलेला सर्व्हे नंबर/गट क्र. ____ | |
| १०. | | |
| ११. | मंजूर बाबींचा तपशिल<br>१. अंदाजपत्रीकीय रक्कम<br>२. प्रत्यक्ष कामावरील खर्च | |
| १३. | अनुदानाची गणना: (विहिरीचे पुनर्भरण साठी वापरलेले साहित्य, मजुरी  इत्यादीचे दर, अनुदान मर्यादा, देय अनुदान इत्यादी बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>बाब- ----------------<br>एकूण अंदाजपत्रीकीय रक्कम - रु. --------------<br>अनुदान मर्यादा- रु. ---------------<br>प्रत्यक्ष कामा प्रमाणे मंजूर अनुदानाची रक्कम- रु. ------------<br>तपासणीनुसार देय होणारी रक्कम- रु. ----------- | |

विहिरीचे पुनर्भरणासाठी वापरलेले साहित्य तांत्रिक निकषानुसार आहे. केलेले काम हे अंदाजपत्र कानुसार व योग्य दर्जाचे आहे. सदर कामाचा योग्य उपयोग होणार आहे. सदर लाभार्थ्यास देय रक्कम रु.------------------अदा करणेस हरकत नाही.

समक्ष-

**लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी /अंगठा** **स्वाक्षरी कृषि सहाय्यक**

**(श्री. )** **दिनांकीत स्वाक्षरी**

(टिप-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास द्यावी)

सोबत : मापन पुस्तिका

**प्रपत्र – ६**

**पर्यवेक्षीय तपासणी अहवाल**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती | |
| ३. | पदनाम | | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/कर्मचारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम | |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>वर्गवारी: ___________<br>(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर) ___________<br>मु.पो. ___________________<br>ता. _________ उपविभाग ___________<br>जि. _______ | |
| ६. | बाब | विहिरीचे पुनर्भरण | |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | | |
| ८. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. ________<br>२. ------------------<br>३. -<br>--------------<br>------------------ | |
| ९. | लाभार्थ्यास देय अर्थसहाय्याची रक्कम रु. | | |
| १०. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | | होय/नाही |
| | नसल्यास तफावत रक्कम रु. | | |
| ११. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | | होय/नाही |
| १२. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | | |
| | | | |

| | |
|---|---|
| | |
| १३. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय |
| | |

तपासणी अधिकारी, श्री.

पदनाम.

(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री.

पदनाम.

(स्वाक्षरी)

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी

(नाव...................)